भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. १६२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक ३०/०३/२०१८

**१) टिप्परच्या धडकेत एकाचा मृत्यु व एक जखमी :--**

दिंनाक २९/०३/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी हा मुलगा मृतक अप्रोज ईसराईल मोहम्मद शेख वय २२ वर्ष रा. मोहाडी व बहीन खैरूल ईशाख कुरेशी वय ७० वर्ष रा. पारशिवनी असे मिळुन मोटार सायकल क्र. ३६ एन २९७९ नी जात असतांना समोरून येणा--या यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपणे, चालवुन मोटार सायकलला धडक देवुन गंभिर जखमी करण्यास खैरूल हिस व अफ्रोजचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी इसराईल मोहम्मद शेख वय ६० वर्ष रा. तिलक वार्ड मोहाडी यांचे रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २७९,३३७,३०४(अ) भादवी. सहकम १८४, १३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. खैरीकर पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) कंटेनरच्या धडकेत एकाचा मृत्यु तीन जखमी :--**

दिंनाक २९/०३/२०१८ चे ८.०० वाजता दरम्यान यातील गोपींचद दयाराम गहाणे वय ४० वर्ष, रा. जांभोरा हा त्याचे ताब्यातील मोटार सायकल क्र. एमएच ३६ एस ७९३९ वर येशुकाबाई गोबाडे वय ६० वर्ष व मुले सारंग वय १० वर्ष, हिमांशु गहाणे यांना बसवुन स्वतःचे गावा वरुन नवेगाव बांध येथे फुले सार करण्यास जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील कंटेनर क्रॉसींग रोड असतांना सुध्दा आपले वाहन हयगयीने, लापरवाहीने, धोकादायक रित्या चालवुन मोटार सायकलला धडक मारुन गोपीचंद गहाणे याचे मरणास व येशुबाई गोबाडे व मुलगा सारंग, हिमांशु गहाणे यांना गंभिर जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३०४(अ),३३७,३३८ भादवी. सहकम १८४/१३४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. निंबेकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**३) मोटार सायकलच्या धडकेत ४ जखमी:--**

दिंनाक २९/०३/२०१८ चे १९.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी जखमी हा त्याची मोटार सायकल क्र. एमएच ३५/२६४९ ने सौ. अल्का वय २७ वर्ष रा. सौदंड व लहान मुलगा १ वर्ष ६ महीने असे मिळुन सौदंड वरून साकोली करीता एनएच ०६ रोडने येत असता सेंदुरवाफा कडुन यातील आरोपी मोटार सायकल चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल हयगयीने, लापरवाहीने चालवुन झुमरी नाला एन एच ०६ रोडवर समोरून फिर्यादीचे मोटार सायकलला धडक देवुन खाली पडला व स्वतः जखमी झाला तसेच मोटार सायकल वर बसलेली सुदंरबाई दोनाडकर ही जखमी झाली व समोरून गाडीला धडक दिल्याने विनोद दुधराम नगरधने व त्याची पत्नी अल्का हे जखमी झाल्याने फिर्यादी विनोद दुधराम नगरधने वय ३० वर्ष रा. सौदंड जि. गोंदिया यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत

**४) मोटार सायकलच्या धडकेत एक गंभीर जखमी :--**

दिंनाक २७/०३/२०१८ चे १८.४५ वाजता दरम्यान यातील फिर्यादीचा भाऊ धोंडु महादेव वरवाडे वय ५५ वर्ष, हा एनएच--६ रोड क्रॉस करुन पायी घराकडे जात असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवुन जखमीस धडक मारुन गंभिर जखमी केल्याने फिर्यादी हिरामन महादेव वरवाडे वय ६० वर्ष, रा. कुंभार मोहल्ला लाखनी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन तसेच किरकोळ अपघात रजी क्र. ९/१८ दिनांक २७/०३/२०१८ वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

५) मोटार सायकलच्या धडकेत दोन जखमी :--

दिनांक २६/०३/२०१८ चे १०.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी तुषार बबनराव सुर्यवंशी वय २३ वर्ष, रा. समता नगर मेंढा रोड भंडारा हा त्याचे आजीला घेवुन ॲक्टीवा क्र. एमएच ३६/ टी --२०१८ नी आंनद मंगल कॉर्यालय भंडारा येथुन त्याचे घरी जात असता विरुध्द दिशेने येणाऱ्या आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन निष्काळजीपणे व भरधाव वेगाने चालवुन फिर्यादी व त्याचे आजीस जखमी होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७,३३८ भांदवि. सहकलम १३४/१७७ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

६) संगनमत करुन नेरला बांधकामाचे ठिकाणातुन लोखंडी सामानाची चोरी :--

दिनांक २८/०३/२०१८ चे २३.०० वाजता दरम्यान यातील दोन्ही आरोपीतांनी संगनमत करुन नेरला कॅनल प्रोजेक्ट बांधकामाचे १० लोखंडी सरीया २५ किलो किंमती १५००/--रु. तसेच लोखंडी चॅनल ४० किलो किंमती २४००/--रु. असा एकुण ३,९००/--रु. चा माल चोरी करुन पळुन जातांनी मिळुन आल्याने, फिर्यादी लालबहादुर छत्रधारी तिवारी वय ३१ रा. हलदीवाडी निरगुडी जि. पुरीया राज्य छत्तीशगड ह. मु. ढाबेटेकडी कनल कॅम्प यांचे तोंडी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ३७९,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सार्वे पोलीस स्टेशन लाखनी हे करीत आहेत.

७) मोटार सायकलची चोरी :--

दिनांक २६/०३/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी नितेश मगरुजी लोंदासे वय २८ वर्ष, रा. ढिवरवाडा याने त्याच्या दुकानात मालकाची होन्डा सी.बी युनिकॉन मोटार सायकल क्र. एमएच ३६ यु २६१० कि. ५०,०००/रु. ची बाहेर येणा--जाण्या करीता मोबाईल दुकाना जवळ स्टॅड वर लावुन ठेवली असता कामानिमीत्त मोटार सायकल ने बाहेर जाण्याकरीता ठेवलेल्या ठिकाणी मोटार सायकल पाहीली असता मिळुन आली नाही, नरजर चुकीने कोणी मोटार सायकल नेली असेल म्हणुन आज पर्यत वाट पाहीली परंतु मिळुन आली नाही, कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेल्याने आज रोजी फिर्यादी यांचे तोंडी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३७९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. गिरडकर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

८) महिलेला लज्जा वाटेल अश्या शब्दाचा प्रयोग करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :--

दिनाक २९/०३/२०१८ चे १३.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही घरा समोर ऊभी असतांना आरोपी याने गावात दारू बंदी का केली, या कारणा वरून फिर्यादीचे घरासमोर चौकात येवुन फिर्यादीचे लज्जेस धोका पोहचेल असे शब्दाचा प्रयोग करून अश्लिल शब्दात शिवीगाळ करून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे तोंडी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २९४,५०६, ५०९ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सरोदे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

९) अश्लिल शब्दात शिवीगाळ करून हाता-- बुक्यांनी मारून जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद :--

दिंनाक २५/०३/२०१८ चे १८.०० वाजता दरम्यान यातील आरोपीने फिर्यादीस फोन लावुन बोलावले व अश्लिल शब्दात शिवीगाळ करून 'तुला नाल्याचे नियोजन कोण करायला लावले' असे बोलुन शिवीगाळ केली या बाबत फिर्यादीस हटकले असता, त्याने पुन्हा फिर्यादीस तु नियोजन करनेवाला कोण होतो, असे म्हणुन हाताने त्याचे डोक्याचे मागे मानेवर व पायावर मारून त्याला खाली रोडवर पाडले व पुन्हा त्याचे उजवे हाताला लाथा-- बुक्यांनी मारून त्यांना जिवाने मारण्याची धमकी दिल्याने, फिर्यादी यांचे लेखी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम २९४,५०६, ५०९ भादवी. सहकलम ३(१)(एस)(आर) अ.जा.ज.अ.प्र.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास उपविभागीय पोलीस अधीकारी तुमसर श्री. साळी पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

१०) अल्पवयीन मुलगी पळुन गेल्याने गुन्हा नोंद :--

दिनाक २७/०३/२०१८ चे १३.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादीची अल्पवयीन मुलगी ही घरी कोणला काही न सांगता शेजारच्या घरी टि.व्ही. पाहण्यास गेली होती ती सांयकाळ पर्यत घरी परत न आल्याने शेजारीच्या घरी विचारण्यास गेला असता, मुलगी ही दुपारी घरी जाते म्हणुन सांगितले तसेच आता पर्यत गावात व नातेवाईकात शोध घेवुन मिळुन न आल्याने शासनाचे परिपत्रकान्वये व फिर्यादी शंकर बाबुराव पारधी वय ६२ वर्ष रा. शास्त्री वार्ड वरठी यांचे तोंडी रिपार्ट वरुन पोलीस स्टेशन वरठी येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. खोकला पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.